| MHAK070008872013 | **<u>नियमित दिवाणी दावा क्र. ७८/२०१३ मधील</u>**<br>**<u>निशाणी क्र. ५९ वर आदेश</u>**<br>(दिनांक ७ फेब्रुवारी, २०२५) |
| --- | --- |

**१.** प्रस्तुत अर्ज प्रतिवादी तर्फे दि.प्र.सं. आ. ६ नि. १७ नुसार दाखल करण्यात आलेला असून त्यामध्ये असे कथन केले आहे की, वादीने नि.क्र.५२ नुसार त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती केली असल्यामुळे त्या दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रतिवादी यांना त्यांच्या लेखी जबाबामध्ये दुरुस्ती करणे आवश्यक आहे. या पुढे असे कथन केले की, त्यांना त्यांच्या लेखी जबाबामध्ये परिच्छेद क्र.९–अ मध्ये नमुद केलेला मजकूर प्रस्तुत अर्जात नमुद केल्याप्रमाणे समाविष्ट करणे आवश्यक आहे. प्रस्तुत दुरुस्ती केल्याने वादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर करण्याची विनंती प्रतिवादीतर्फे करण्यात आली आहे. वादीतर्फे त्याच अर्जावर म्हणणे सादर करुन अर्जास विरोध करुन अर्ज नामंजुर करण्याची विनंती करण्यात आली.

**२.** अर्ज, म्हणणे व अभिलेख पाहीले. प्रतिवादीतर्फे ॲड. एस. टी. इंगळे यांचा युक्तीवाद ऐकला तसेच वादीतर्फे ॲड. एस. एस. गोळे यांचा युक्तीवाद ऐकला.

**३.** वर नमुद बाबींचे आणि संपुर्ण प्रकरणाचे अवलोकन केले असता असे दिसून येत आहे की, नि.क्र.५२ नुसार वादीने त्यांच्या दाव्यामध्ये दुरुस्ती केलेली असून त्या दुरुस्तीच्या अनुषंगाने प्रस्तुत अर्ज प्रतिवादीतर्फे सादर करण्यात आलेला आहे. प्रतिवादीच्या दुरुस्तचे स्वरुप पाहता असे दिसून येत आहे की, सदर दुरुस्तीने दाव्याच्या/जबाबाचे स्वरुपात कोणताही बदल होणार नसून या उलट दाव्यातील संपुर्ण वादाचे निराकरण होण्यास मदत होणार आहे. सदर नियोजित दुरुस्तीने वादीच्या हक्कास कोणताही बाधक परिणाम होणार नाही. दावा गुणदोषांवर काढण्यासाठी प्रस्तुत दुरुस्ती करणे आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. सबब, न्यायाच्या दृष्टीने खालील आदेश पारीत करण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

**१.** प्रस्तुत अर्ज (नि.क्र.५९) मंजुर करण्यात येत आहे.

२. प्रतिवादी यांनी प्रस्तावित दुरुस्ती ही १४ दिवसांचे आत करुन जबाबाची दुरुस्त प्रत अभिलेखावर दाखल करावी.

VISHNU DATTARAO GITE

Digitally signed by VISHNU DATTARAO GITE
Date: 2025.02.07 17:49:05 +0530

दिनांक : ०७/०२/२०२५.

ठिकाणः बाळापूर

**( विष्णु द. गिते )**
सह दिवाणी न्यायाधीश, (क.स्तर),
बाळापूर.

<u>प्रमाणपत्र</u>

मी अधिकथन करतो की, पी.डी.एफ. करुन अपलोड केलेल्या न्यायनिर्णय/आदेश/ पुरावा मधील शब्द नि शब्द हे मुळ न्यायनिर्णय/पुरावा/आदेशाप्रमाणे आहेत.

| | | |
|---|---|---|
| न्यायालयाचे नाव | :- | **श्री. विष्णु द. गिते,**<br>सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,<br>बाळापूर |
| लघुलेखकाचे नाव | :- | अजय एन. हांडे |
| घोषित दिनांक | :- | ०७/०२/२०२५ |
| न्यायनिर्णय/ आदेश/ पुराव्यावर पिठासीन अधिकारी यांनी केलेल्या स्वाक्षरीचा दिनांक | :- | ०७/०२/२०२५ |
| अपलोड केल्याचा दिनांक | :- | ०७/०२/२०२५ |